तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य ,
३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्र. १९६७,मुंबई ४०० ००१.

क्रमांक - २/ एनजीसी/०२९९/ ७० ८८
दिनांक - / 
- 5 OCT 1999

प्रति,

अध्यक्ष,
आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ,
उस्मानाबाद.

**विषय - आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के.टी.कॉलेज ऑफ फार्मसी , उस्मानाबाद या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० पासून औषध निर्माणशास्त्रपदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात शासनाने शासन निर्णय क्र.पीसीआय-१०९९/( ५१६/९९)तांशि-१दि. ६-९-९९ अन्वये आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे कें.टी.पाटील कॉलेज ऑफ फार्मसी उस्मानाबाद या खाजगी संस्थेत शैक्षणीक वर्ष १९९९-२००० पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास मान्यता दिली आहे. नवीन संस्था सुरु करण्यासाठी शासननिर्णय १९/८/९८ मध्ये नमुद केलेल्या अटीप्रमाणे संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांच्या संयुक्त खात्यात प्रथम वर्षासाठी रु.५.००/- लाख नियतठेव म्हणून राष्ट्रीयकृत बँकेत किंवा शेडयुल बँकेत पाच वर्ष मुदतीसाठी ठेव ठेवणे आवश्यक आहे तथापी आपण आपले पत्र क्र.ए.एस.पी.एम./२२२/९९ दि.५/१०/९९ अन्वये, सदर नियतठेव संयुक्त खात्यात जमा करण्यासाठी नोव्हेंबर ९९ पर्यत मुदतवाढ मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

तरी आपली विनंती मान्य करुन कळविण्यात येते की, ३० नोव्हेंबर ९९ पर्यत आपण सदर नियतठेव संयुक्त खात्यात जमा करुन त्याची मुळ पावती या कार्यालयास सादर करावी. आपण नोव्हेंबर अखेर पर्यत नियतठेव जमा कराल या अटींवर आपल्या संस्थेत शै.वर्ष १९९९-२००० मध्ये प्रवेश करण्यास मंजूरी देण्याचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

Maharashtra University of Health Sciences Nashik

( प्र . ह . क्षीरसागर )
**प्र. संचालक,**
**तंत्रशिक्षण म.रा. मुंबई.**

प्रत- १) कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विदयापीठ ,गंगापूररोड,नाशिक.यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
२) सहसंचालक,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय औरंगाबाद यांना माहितीसाठी.

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, उस्मानाबाद या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून औषध निर्माणशास्त्र ह्या पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मंजूरी देण्याबाबत

## महाराष्ट्र शासन
### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक :पीसीआय-१०९९/(४१६/९९) तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ सप्टेंबर, १९९९.

संदर्भ :(१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांचे क्रमांक :एफ ७४०-८९-१६१ -(पी) /स्टी / ९९, दिनांक १/९/९९ चे पत्र.

**शा स न नि र्ण य :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक १/९/१९९९ च्या पत्रान्वये आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, उस्मानाबाद या खाजगी संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून औषधनिर्माणशास्त्र ह्या पदवी अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यासाठी काही अटी व शर्तीवर मंजूरी दिलेली आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेता संबंधित संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून प्रस्तावित अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये संबंधित संस्थेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून औषध निर्माणशास्त्र ह्या पदवी अभ्यासक्रम ३० प्रवेश क्षमतेसह कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे. :--

२. सदर मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच शासनाने दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल व संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्र शिक्षण संचालकांच्या संमतीने संस्थेकडून समाधानकारकरित्या करण्यात येतील.
३. प्रस्तावित अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणास संस्थेने आरोग्य विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे [illegible] भरुन इतर कायदेशिर बाबींची पूर्तता करावी.

PRINCIPAL
K.T. Patil College of Pharmacy

२. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थेने प्रवेश आरोग्य विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत करण्यात येतील.

३. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम, विषय नोंद वहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्र. ह. क्षीरसागर )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, आरोग्य विद्यापीठ, नाशिक
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
कार्यासन अधिकारी /मांश-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
संबंधित संस्थेस

प्रत माहितीसाठी -
१. अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ) भारत शासन, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आर. पी. इस्टेट, नवी दिल्ली-११० ००२
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार ( तांत्रिक ) भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय ( शिक्षण विभाग ), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल अॅशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
३. निवड नस्ती, तांशि-१